वि.दि.दावा क्र.१०/२०१७ नि.क्र.११०

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ३</u>**

**<u>नाव जितेंद्र केशव रघुते</u>**

**<u>साक्षीदाराचा सरतपास वादी तर्फे विद्वान वकील श्री. ठोंबरे मार्फत शपथेवर सुरु -</u>**

दाव्यात मी माझा पुरावा शपथपत्राद्वारे दिलेला आहे. आता मला ते शपथपत्र दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे.

२. निशाणी क्र.३६, ३७ व ३८ यावरील करारनामे मला दाखविले. सदर करारनामे माझे समक्ष झालेले आहेत. त्यावरील सर्व सहया मी ओळखतो. त्या माझ्या समक्ष करण्यात आलेल्या आहेत. त्यातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे.

३. दि.२७.०४.२०१५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, उमरेड येथे मी, वादी व साक्षीदार पंकज बावनकुळे हजर होतो. आम्ही ११.०० ते ०५.०० या कालावधीत तेथे हजर होतो. त्याबाबत नोंद घेण्यासाठी आम्ही संबंधीत कार्यालयात अर्ज सादर केला होता. तो अर्ज आता मला दाखविला. तो मी वाचला होता. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर कार्यालयाने तो अर्ज स्विकारला होता व त्याबाबत कार्यालयाचा शिक्का व संबंधीतांची सही आहे. त्यावर माझ्या वडीलांची सही आहे. त्यास **निशाणी क्र.११२** देण्यात आला.

४. दि.२७.०४.२०१५ रोजी वरील लोक सदर कार्यालयात हजर होतो याबाबत माझे वडील वादी यांचे तसेच दोन साक्षीदारांचे शपथपत्र तयार करण्यात आले होते. आता मला वादीचे शपथपत्र दाखविले. त्यावर वडीलांची सही आहे. ते माझ्या समक्ष झाले होते. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.११३** देण्यात आला.

५. साक्षीदार पंकज बावनकुळे व माझे एकत्रीत शपथपत्र मला दाखविले. त्यावर त्यांची सही आहे. तसेच माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.११४** देण्यात आला.

६. दि.२५.०५.२०१५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, उमरेड येथे मी, वादी व साक्षीदार पंकज बावनकुळे हजर होतो. आम्ही ११.०० ते ०५.०० या कालावधीत तेथे हजर होतो. त्याबाबत नोंद घेण्यासाठी आम्ही संबंधीत कार्यालयात अर्ज सादर केला होता. तो अर्ज आता मला दाखविला. तो मी वाचला होता. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर कार्यालयाने तो अर्ज स्विकारला होता व त्याबाबत कार्यालयाचा शिक्का व संबंधीतांची सही आहे. त्यावर माझ्या वडीलांची सही आहे. त्यास **निशाणी क्र.११५** देण्यात आला.

७. दि.२५.०५.२०१५ रोजी वरील लोक सदर कार्यालयात हजर होतो याबाबत माझे वडील वादी यांचे तसेच दोन साक्षीदारांचे शपथपत्र तयार करण्यात आले होते. आता मला वादीचे शपथपत्र दाखविले. त्यावर वडीलांची सही आहे. ते माझ्या समक्ष झाले होते. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.११६** देण्यात आला.

८. साक्षीदार पंकज बावनकुळे व माझे एकत्रीत शपथपत्र मला दाखविले. त्यावर त्यांची सही आहे. तसेच माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.११७** देण्यात आला.

९. साक्षीदार हनुमंत अंधारे हे मयत आहेत. दि.२७ जुन २०१५ रोजी ते नागपुर येथे मयत झाले. त्यांच्या कुंटुंबीयांनी त्यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची छायांकीत प्रत मला दिलेली आहे. ती प्रकरणात दाखल आहे. त्यास निशाणी क्रमांक देण्यात यावा. श्री. सोनक विधीज्ञ यांनी हरकत घेतली नाही. त्यास **निशाणी क्र.११८** देण्यात आला.

१०. दि.१५.०३.२०१८ रोजी तहसीलदार उमरेड यांच्याकडे वादीचे नाव ताबेदार या सदरेखाली घेण्यात यावे यासाठी अर्ज दिला होता. त्या अर्जाची प्रमाणीत प्रत मला दाखविली. त्यावर माझ्या वडीलांची सही आहे. सदर अर्ज देतांना मी वडीलांसोबत होतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.११९** देण्यात आला.

११. दि.१५.०३.२०१८ रोजी तहसिलदार, उमरेड यांचे मार्फत मौक्का पंचनामा करण्यात

आला होता. त्या पंचनाम्याची प्रमाणीत प्रत आता मला दाखविली. त्यावर माझ्या वडीलांची सही आहे. तसेच आजुबाजुच्या शेतकऱ्यांच्या सहया आहेत. त्यावेळी मी तेथे हजर होतो. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१२०** देण्यात आला.

**उलटतपास – प्रतिवादी यांचे विधीज्ञ श्री. सोनक यांच्या मार्फत.**

१२. सन १९९८ पासुन माझा किराणा सामानाचा नागपुर येथे व्यवसाय आहे. त्याचा गोमास्ता माझ्याकडे आहे. मी तो दाखल करु शकतो. सदर दुकानाचे वार्षिक उत्पन्न अंदाजे ६ ते ७ लाख रुपये आहे. मी आयकर विवरण पत्र भरत असतो. सन १९९८ पासुन चालु वर्षापर्यंत मी विवरण पत्र भरलेले आहे. मी ते न्यायालयात दाखल करु शकतो. सदर व्यवहारापोटी मी वडीलांना पैसे दिले व वडीलांनी प्रतिवादीला दिले याची नोंद मी विवरण पत्रात दर्शविलेली नाही. जमीन विक्रीस काढलेली याबाबतची माहीती मला व वडीलांना शिवकुमार जयस्वाल यांनी दिली होती.

१३. दि.२५.११.२०१३ रोजी वडीलांनी बँकेतुन तिन लाख रुपये काढले होते हे दाखविण्यासाठी आमच्याकडे बँकेचे स्टेटमेंट आहे व त्यावेळी मी वडीलांसोबत होतो. महाराष्ट्र बँक शाखा मांढळ या बँकेतुन पैसे काढले होते.

१४. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्र परिच्छेद क्र.४ मधे नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादींनी आम्हाला म्हणजेच मला किंवा वडीलांना कुठलीही विनंती केलेली नव्हती. खरेदी खत नोंदवायला गेलो त्यावेळी त्यांनी आम्हाला तशी विनंती केली होती.

१५. माझे शपथपत्रील परिच्छेद क्र.५ मधे नमुद दोन लाख रकमेचा शेती उत्पन्नाचा पुरावा आमच्याकडे उपलब्ध आहे व आम्ही तो दाखल करु शकतो. सदर दोन लाख रकमेमधे माझी रक्कम किती व वडीलांची रक्कम किती याबाबत मला फार काही आठवत नाही.

१६. दि.२६.०३.२०१४ रोजीच्या निशाणी क्र.३८ च्या वेळी मी एकुण किती रक्कम दिली व वडीलांनी एकुण किती रक्कम दिली होती हे मला आठवत नाही.

१७. माझे शपथपत्रातील परिच्छेद क्र.७ मधील व्यवहार कधी ठरला व कोठे ठरला हे मला आठवत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, करारनामा व विक्री पत्र या दरम्यानच्या कालावधीत तो व्यवहार ठरला होता.

१८. रु.१८,१०,०००/- ही रक्कम बाजारभावाप्रमाणे पुर्ण जमीनीची होती. पुर्ण जमीन म्हणजे १.१६ हेक्टर होती. प्रतिवादी यांनी डी.डी. च्या स्वरुपात विस लाखाची मागणी केली होती म्हणुन विस लाखाचा डी.डी. करण्यात आलेला होता.

१९. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील परिच्छेद क्र.७ मधील दि.२२.१२.२०१४ रोजी प्रतिवादी हजर राहीले नाहीत याबाबतचा मजकुर व त्या परिच्छेदातील संपुर्ण मजकुर खोटा आहे.

२०. दि.२२.१२.२०१४ रोजी आम्ही नगदी रक्कम किती घेवुन आलो होतो हे वडीलांना माहीती आहे मला माहीती नाही. दि.२२.१२.२०१४ रोजीची संपुर्ण रक्कम वडीलांनी स्वतः कडुन दिली होती.

२१. हे म्हणणे खरे नाही की, दि.१४.०२.२०१५ रोजीच्या नोटीसनंतर प्रतिवादी वडीलांना भेटले व त्यांनी जागेचा ताबा दिला व एप्रिल २०१५ मधे खरेदी खत करुन देवुन याबाबतचा संपुर्ण मजकुर खोटा आहे.

२२. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र.३६, ३७ व ३८ या करारनाम्यामधे ताबा दिल्याचा उल्लेख नाही.

२३. निशाणी क्र.३९ वरील खरेदी खताच्या मसुद्यात असा मजकुर आहे की, आज रोजी ताबा देण्यात येत आहे.

२४. दि.२०.१२.२०१४ रोजी प्रतिवादी यांनी ताबा दिला होता असे माझे वडीलांनी साक्षीत नमुद केलेले आहे व तो मजकुर बरोबर आहे.

२५.  ७/१२ उताऱ्यात माझ्या वडीलांच्या नावे वहीतीच्या सदराखाली नोंद आहे. त्याची प्रत मी दाखल करु शकतो. हे मला माहीत आहे की, माझ्या वडीलांनी त्यांचा ताबा आहे व तो कायम करावा याबाबत दिलेला अर्ज नामंजुर करण्यात आलेला आहे. तो निशाणी क्र.५ वरील अर्ज आहे. दि.२२.१२.२०१६ रोजी तो नामंजुर झालेला आहे. त्या विरोधात वडीलांनी जिल्हा न्यायालयात अपील केले होते याबाबत मला माहीती नाही.

यावेळी श्री. सोनक यांनी असे नमुद केले की, साक्षीदार सांगतात त्याप्रमाणे दस्त प्रकरणात दाखल असल्याचे दिसुन येत नाही. श्री. ठोंबरे देखील ते मान्य करतात. साक्षीदार तसा दस्त सादर करण्यास तयार आहे. यास्तव उलटतपास तहकुब करावा अशी विनंती करण्यात आली. या कारणास्तव पुढील उलटतपास तहकुब करण्यात येतो.

समक्ष,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड
दि. ०३.०२.२०२६

श्रवणोत्तर स्विकृती,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड